# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL,NAGPUR**

*Tele. No. Office:-2743588* *FAX NO. 0712-274448*

No. pwd /PS/Qt/Enq./ 19375 /2024 Dt.10 /09/2024

**Quotation**

## दरपत्रक सुचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरामधील असलेली विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे यांचे दरपत्रक पध्दतीने विक्री करणे करीता इच्छूक लिलावदारांचे सहभागाकरीता सदर सुचना प्रसिध्द करण्यात येत असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ) प्रस्तावित नविन स्वतंत्र परिचर्या महाविद्यालय इमारतीच्या जागेमध्ये असलेली झाडे - ८० झाडे ,

ब) या संस्थेतील प्रस्तावित पार्कीग प्लाझा इमारतीच्या जागेमध्ये असलेली झाडे - ५९ झाडे,

**वरील दोन्ही कामाचे विवरणपत्र सोबत जोडलेले असुन या रकमेपेक्षा कमी कीमतीचे देयकार स्विकारण्यात येणार नाही.**

१) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेतील परिसरामध्ये असलेल्या विविध प्रकारची उभी असलेली झाडे यांना दर लागू राहिल. दरपत्रके www.gmcnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध असुन सदर दरपत्रके या कार्यालयातील बांधकाम विभागास सादर करावी.

२) इच्छुक दरपत्रकदारकाचे दस्ताऐवज व अन्य बाबतची पडताळणी संस्थेतील समितीकडुन करुन त्यांना सहभागी होणेसाठी पात्र करण्यात येईल.

३) ईच्छुक लिलावदारांनी दि.१०/०९ /२०२४ ते दि.१७ /०९/२०२४ (वेळ १७.००) या कालावधीत आवश्यक बाबींची पूर्तता करुन विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे यांची किंमत संपुर्ण माहितीसह दरपत्रकामध्ये सादर करावे तसेच झाडे कापण्याचा दर जीएसटीसह इत्यादी आकारणी व अधिभारासहीत दरपत्रकरमध्ये नमुद करुण दरपत्रके या कार्यालयात सादर करावे.उशिरा प्राप्त झालेले कोटेशन स्विकारण्यात येणार नाही

४) उक्त नमुद कालावधीच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दरपत्रकाद्वारे विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे लिलावदार यांना पाहण्याची मुभा आहे.

५) दरपत्रकामध्ये जे लिलावदार H-१ मुल्यांकण दराच्या वर राहिल त्यांना झाडे उचल करण्यापुर्वी आदेशातील अटी व शर्ती लागु राहतील. तसेच **मंजुर करण्यात आलेल्या निविदाकारास रु.१००/- च्या स्टॅम्प पेपर वर करारनामा करावा लागेल.**

६) ज्या दरपत्रकदारकाचे स्विकती नंतर त्वरीत कामास उपविभागीय अभियंता सा.बा.वि.कं.५,नागपूर यांच्या निर्देश्रखाली झाडे कापणे व उचल करणे याची सुरवात करावी लागेल संम्पुर्ण झाडे कापणे व उचल करणे काम १५ दिवसात पूर्ण करावे लागेल.सदर कामास विलंब झाल्यास प्रतिदिवस रु.५००/- प्रमाणे क्षतिपूर्ती आकारण्यात येईल.

७) संस्थेत असलेल्या विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे या लिलावाबाबत मागविण्यात येत असलेल्या दरपत्रके रदद करण्याचा अथवा यामध्ये बदल करण्याचा अधिकार अधिष्ठाता शावैमवरु यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

**अधिष्ठाता**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर**